# शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

Tel.No. (07263) 295011, 295022 Email ID office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

जनसंपर्क अधिकारी कार्यालय


Via Email -: diobuldana@gmail.com

जावक क्र शातंनिखा/जनसंपर्क अधिकारी/२०२६/ 1710

दिनांक ०४/०९/२०२६

प्रति,

मा जिल्हा माहिती अधिकारी,
बस स्थानकाजवळ, चैतन्यवाडी,
बुलढाणा-४४३००१

**विषय** -: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष थेट अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेशाची अतिरिक्त फेरी सुचना विविध वर्तमानपत्रात बातमीवजा (जाहिरात नव्हे) प्रसिद्ध करण्याबाबत विनंती.

**संदर्भ** -: मा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र २०७३, दि ०४/०८/२०२६.

मा महोदय,

खालील सुचना विविध वर्तमानपत्रात बातमीवजा (जाहिरात नव्हे) प्रसिद्ध करण्यात यावी, अशी आपणास नम्र विनंती करण्यात येत आहे. आपल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

"तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष थेट अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या केद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या ४ फे-यांनंतर आणि संस्थेमध्ये रिक्त राहिलेल्या जागांकरिता प्रवेशाची अतिरिक्त प्रवेश फेरी मागील महिन्यात पार पडल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन खामगांव या संस्थेत गुरुवार दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता थेट द्वितीय वर्ष तर शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रथम वर्ष याप्रमाणे घेण्यात येणार आहे.

तरी सदर प्रवेश फेरीकरिता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या केद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या मुळ प्रमाणपत्रांसह व विहित शुल्कासह वेळेवर हजर राहावे. याआधी इतरत्र प्रवेश घेतलेला असल्यास त्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळेस Proforma-N सादर करणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी ईच्छूक विद्यार्थ्यांनी संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या प्राचार्यांनी आणि प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश समितीने केलेले आहे."

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

**प्रत** -:

(१) मा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना सविनय सादर
(२) प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश समन्वयक २०२६-२७, शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव यांना माहितीसाठी